प्रेसनोट

दिनांक १९/११/२०२१

**आरोपी लोकसेवक १) विजयसिंह गणपती पुजारी, वय ५६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद मुख्याध्यापक, वाळुज प्रशाला, वाळुज, ता.मोहोळ २) खाजगी इसम शाम उर्फ रोहित जनार्दन कादे, व्यवसाय संस्था सचिव, जवाहर ग्रामविकास मंडळ, वाळुज ता.मोहोळ जि. सोलापूर यांच्यावर रु ५,००,०००/- ची लाच मागणी करुन पहिला हप्ता लाच रक्कम रु १,००,०००/- आरोपी क्र.०१ यांनी आरोपी क्र.०२ यांचेवतीने स्विकारलेवरुन गुन्हा दाखल.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, १२ प्रमाणे |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | १) विजयसिंह गणपती पुजारी, वय ५६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद मुख्याध्यापक, जवाहर ग्रामविकास मंडळ, वाळुज ता.मोहोळ जि. सोलापूर या संस्थेअंतर्गत वाळुज प्रशाला, वाळुज,<br>२) खाजगी इसम शाम उर्फ रोहित जनार्दन कादे, व्यवसाय संस्था सचिव, जवाहर ग्रामविकास मंडळ, वाळुज ता.मोहोळ जि. सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५,००,०००/- रु लाचेची मागणी करुन त्यातील पहिला हप्ता रु १,००,०००/- |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १,००,०००/- रु |
| **थोडक्यात माहिती** | पडताळणी दि १७/११/२०२१ व १८/११/२०२१<br>सापळा दि १८/११/२०२१<br>यातील तक्रारदार यांनी त्यांचे दिवंगत वडिलांचे जागेवर अनुकंपा तत्त्वावर कनिष्ठ लिपीक या पदावर नोकरी मिळणेकरीता जवाहर ग्रामविकास मंडळ, वाळुज ता.मोहोळ या संस्थेमध्ये विनंती अर्ज केला होता. परिणामी संस्थेकडुन तक्रारदार यांचे विनंती अर्जावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने यातील त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केले होते.<br>सदर रिट पिटीशन अर्जावर मा.न्यायालयात तक्रारदार यांचे बाजुने म्हणणे मांडुन त्यांना अनुकंपा तत्वावर संस्थेमध्ये नोकरी देण्याकरीता यातील दोन्ही आरोपींनी तक्रारदार यांचेकडे १४ लाख रुपये व सेवेत सामावुन घेतल्यानंतर प्रत्येक वर्षी एक महिन्याचा पगार अशी लाचेची मागणी केली होती. त्यास अनुसरुन तक्रारदार यांनी रु १४ लाख पैकी ०९ लाख रु पहिला हप्ता म्हणुन नोकरीमध्ये रुजु होण्यापुर्वीच यातील आरोपींना समक्ष दिला होता.<br>त्यानंतर न्यायालयाचे निर्णयानुसार तसेच तक्रारदार यांचे विनंतीनुसार तक्रारदार यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आलेनंतर यातील आरोपी मुख्याध्यापक यांनी तक्रारदार यांचेकडे १४ लाख रुपये रक्कमेपैकी उर्वरीत ०५ लाख रुपये संस्थेचे सचिव यांना देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे तगादा लावुन सदर ०५ लाख रुपये घेवुन भेटण्याकरीता बोलावित होते.<br>त्यावरुन दि. १७/११/२०२१ व १८/११/२०२१ रोजी दोन्ही आरोपींकडे पडताळणी कारवाई करण्यात आली असता पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक मुख्याध्यापक यांनी रु ०५ लाखांपैकी पहिला हप्ता रु ०१ लाख घेण्याचे मान्य केले व सापळा कारवाई दरम्यान सदरची लाच रक्कम आरोपी सचिव यांना देण्याकरीता स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन आरोपी मुख्याध्यापक यांना ताब्यात घेण्यात आले आहे व आरोपी संस्था सचिव यांना ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असुन सविस्तर गुन्हा दाखल करण्यात येत आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे<br>श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| **सापळा पथक** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- सपोफौ चडचणकर, पोह सोनवणे, पोना घुगे, पोना घाडगे, पोशि जानराव, पोशि पवार, पोशि सण्णके, पोशि मुल्ला चापोशि सुरवसे, सर्व ने. ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **टोल फ्री क्रमांक- १०६४ वर किंवा पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर येथे** संपर्क साधावा.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार** – acbmaharashtra.net

**दुरध्वनी क्रमांक**- ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक** – ९९३०९९७७००

१९/११

**सहा. पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.**

Scanned with CamScanner